- प्रेस नोट -

दि. १०/११/२०२६

जुहू पोलीस ठाणे - खुन

फिर्यादी राकेशकुमार विद्यानंद चौधरी, वय- २४ वर्षे, धंदा- चालक, रा.ठी. विलेपार्ले (प), मुंबई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि.०८/११/२०२६ रोजी २३.०० वा.च्या सुमारास व्हि.एम.रोड, सानिध्य बिल्डींग, एचडीएफसी बॅंकेच्या समोरील, गेटच्या बाहेरील फुटपाथवर विलेपार्ले, मुंबई येथे बुलेट (मोटार सायकल) वरुन आलेल्या अटक आरोपी क्रमांक ०१ पुरूष वय- २४ वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०२ पुरूष वय- २२ वर्षे व विधीसंघर्षग्रस्त बालक या तीन अनोळखी इसमांनी सहकारी भंडार सिग्नेचर या दुकानासमोरील रस्त्यावरील बुलेटजवळ फटाका फोडल्यावरुन झालेल्या वादात, फिर्यादींना हाताने मारहाण केली. तसेच शुभंकर वय १८ वर्षे यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने मारहाण करुन त्याच्या मृत्युस कारणीभुत ठरले म्हणुन दि.०९/११/२०२६ रोजी गु.र.क्र. १७४९/२६, कलम १०३(१),११५(२),३(५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
